ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – V February 2014

# महात्मा फुले यांचे धर्मविषयक चिंतन

अजय ए. अहिर,
कला, वाणिज्य व विज्ञान,
महाविद्यालय, हरसूल,
ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक.

19 व्या शतकात महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षितिजावर महात्मा जोतिराव फुले या क्रांतीसूर्याचा उदय झाला. या क्रांतीसूर्याने तत्कालीन महाराष्ट्रात मानवाच्या समग्र उन्नतीचे ध्येय उराशी बाळगून, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या आधुनिक मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी पर्यायी संस्कृती निर्माण केली. महात्मा फुले यांनी शूद्रातिशूद्र, स्त्रिया, शेतकरी या उपेक्षित घटकांना अस्मिता प्राप्त करून दिली. मानवी मूल्यांचे सैद्धांतिकीकरण करत असताना मानवाच्या जीवनाचा महत्वाचा भाग असणाऱ्या 'धर्म' या संस्थेचे महात्मा फुलेंनी सखोल चिंतन केले.

प्राचीन काळापासून धर्म या संस्थेची उत्क्रांती होत आलेली आहे. निसर्गोपासने पासून ते यज्ञादीकर्मकांडापर्यंत अनेक उपासना पद्धती धर्मात निर्माण झाल्या. या सर्वांचा मानवाच्या जीवनावर सखोल परीणाम होत राहिला त्यातून विषमतेवर आधारीत मानवी समाज व्यवस्था उभी राहीली. या विषमतेच्या विरोधात लढा देत असताना 'धर्म' या संकल्पनेची आधुनिक तत्वांवर पुर्नःमांडणी करण्याचे महत्वाचे काम महात्मा फुल्यांनी केले.

**सार्वजनिक सत्यधर्म**

महात्मा फुल्यांनी मूलभूत मानवी हक्कांच्या आधारे धर्माचा विचार मांडला. सर्व प्रकारच्या सामाजिक शोषणाला विरोध करून मानवाच्या मुक्तीचा विचार म्हणजेच मानवी हक्कांचा विचार होय. गुलामगिरी व सार्वजनिक सत्यधर्म या दोन पुस्तकावरून महात्मा फुल्यांच्या वैचारिक मूल्यांची जाणीव होते. गुलामगिरीतील संदेश आपणांस भारतातील परंपरागत, ब्राह्मण प्रधान, धार्मिक व सामाजिक संस्कृतीच्या विरुद्ध उठाव करण्यास प्रेरीत करतो तर सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात त्यांना पर्यायी निर्माण करावयाच्या समाजिक संस्थांची तत्वे विशद करतात. ही तत्वे म्हणजे स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व होत.

'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातील म. फुलेंचे विचार वाचले की लक्षात येते हे विचार भारतातील लोकशाही क्रांतीच्या अग्रदूताचे विचार होत. म. फुले म्हणतात, ''व्यक्ती स्वातंत्र्य आणि समता यांनी भरलेले सामाजिक जीवन हेच पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य होय. यावरून पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य ही कल्पना फुल्यांनी खिश्चन धर्मापासून मिळवली असावी असे वाटते. परंतु म. फुलेंनी खिश्चन धर्माच्या कल्पनेहून निराळे पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य आदर्श म्हणून आपल्यापुढे ठेवले आहे. जोतिबा म्हणतात,'' ''मानवांना धर्म संस्थानी एकमेकांपासून

विभक्त व एकमेकांचे शत्रू बनवून ख्रिश्चन, मुसलमान इ. भेद पाडले आहेत, हे भेद भयानक धर्मकल्पनांवर आधारलेले आहेत.'' धर्मग्रंथ हे ईश्वर प्रणित किंवा ईश्वरी प्रेरणेने निर्माण केले आहेत असे म्हणणाऱ्या धर्मसंस्थाचा त्यांनी निषेध केला. जगातील सर्व धर्म हे गैर समजावर व अंधश्रद्धेवर उभारले आहेत. त्यात जे सांगितले आहे तेच सत्य आहे असे म्हणता कामा नये. असे जोतिराव म्हणतात.

डॉ. विश्राम रामजी घोले हे म. फुल्यांचे समकालीन होते. त्यांनी 1888 साली म. फुल्यांच्या ग्रंथाला प्रस्तावना दिली आहे. डॉ. घोले म्हणतात, ''म. फुल्यांनी धर्मप्रकरणी सत्या सत्य व कार्यकारणभाव यांचा शोध लावण्यास लोकांना सवयी लावल्या. अमूक चाली बऱ्या किंवा वाईट यांचा न्याय त्यापुढे मांडला,'' जोतिरावांनी ''सत्य वर्तन केल्याशिवाय मानव प्राणी जगात सुखी होणार नाही'' या तत्वाने सर्वजनिक सत्यधर्म पुस्तकाला प्रारंभ केला आहे. जोतितत्व प्रणालीमध्ये सर्वांनी सद्वर्तनाने वागावे, सर्व मनुष्यास सारखे हक्क असावेत, जाती भेद नसावा, स्त्री–पुरुषास समान हक्क असावेत या गोष्टी सांगितल्या आहेत.

जोतिबांचा विचार निर्गुणपणे पुढे न येता कार्यशीलपणे पुढे येतो. नव्या सामाजिक संरचनेच्या निर्मितीचा विचार फुल्यांनी मांडला. वज्रसूची, कबीर, तुकाराम, थॉमसपेन ही जोतिरावांची प्रेरणास्थाने होती. विज्ञानवाद, उपयुक्ततावाद, युरोपातील धर्मसुधारणा चळवळीचा परिणाम महात्मा फुल्यांवर होता. महात्मा फुल्यांच्या धर्माचा पाया नीती आणि सत्य आहे. नीती संबंधी म. फुले म्हणतात, ''आपल्या सर्वांच्या निर्मिकास संतोष देण्यासाठी सार्वजनिक सत्याचे भय मनी धरून जो कोणी इतर मानव बांधवा बरोबर आचरण करील त्यास नीती म्हणावी. राम आणि कृष्ण यांची काही बाबतीतली वागणूक देवाला शोभण्यासारखी नव्हती, नीतीला धरून नव्हती असे जोतिरावांनी म्हटले आहे. त्यांनी ज्ञानेश्वरीच्या बाराव्या नि तेराव्या अध्यायावर कडक टिका केली आहे. 'नीती' विषयीचा विचार अब्राह्मणी दृष्टीकोनातून म. फुले मांडतात. फुले म्हणतात प्रारब्ध हे मिथ्या आहे. बायबल, कुराण सर्वांना वाचण्याचे मोकळीक आहे परंतु वेद सर्वांना खुले नाहीत. ब्राह्मणीग्रंथ हे बाह्यतः धर्मासंबंधी वाटतात परंतु आतून ते पूर्णतः राजकीय आहेत. फुल्यांनी ब्राह्मणी धर्मग्रंथाचा फोलपणा व राजकारण स्पष्ट केले आहे. ज्याप्रमाणे प्रत्यक्ष व अनुमान ही बौद्धज्ञानाची प्रमाणे शास्त्रीय ज्ञानाचीही प्रमाणे आहेत. म.फुल्यांनी या प्रमाणांचा स्विकार करून सत्यधर्माला इहवादी अधिष्ठान पुरवले त्यांनी परलोक मान्य केला नाही, सर्व माणसाच्या ऐहीक जीवनातील सुख सिद्धी शिवाय कोणतेही दुसरे साध्य 'धर्माचे साध्य' म्हणून त्यांनी मान्य केले नाही.

**डेइस्ट धर्मविचारांचा प्रभाव**

मानवनीती सांगणाऱ्या सत्य धर्माचा शोध म. फुल्यांनी जसा जाती संघर्षाच्या भारतीय परंपरेत घेतला तसा तो जागतिक विचार प्रवाहांमध्येही घेतला. भारतात जाती संस्थेच्या उच्छेदासाठी आवश्यक असणाऱ्या तत्वज्ञानाला त्यांनी जागतिक विचारसरणी मधून शोधून काढले. पुनरुज्जीवर व प्रबोधन चळवळीमुळे युरोपमध्ये आमूलाग्र परिवर्तनाला सुरुवात झाली जर्जर झोल्या सरंजामशाहीचे पतन होऊन भांडवलशाहीची समाजक्रांती घडून येऊ लागली. प्रबोधन कालीन विवेकवादाने धार्मिक क्षेत्रातही मोठी उलथापालथ घडवून आणली. समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये समाज परिवर्तनाच्या ऊर्जेचा उद्रेक घडून आला. विवेवादाची ख्रिश्चन आवृत्ती म्हणून युनिटेरीयन

आणि डेइस्ट या धर्मचळवळी उदयाला आल्या. 'डेइस्ट' हा शब्द 'थेईस्ट' या शब्दाच्या पार्श्वभूमीवर किंबहुना विरोधात निर्माण झालेला आहे. दोन्ही पंथ ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवणारे म्हणजे आस्तिकच आहेत. थेईस्ट हे परंपरावादी आणि पोथी प्रामाण्यवादी म्हणजे बायबलवर विश्वास ठेवणारे, तर डेइस्ट बुध्दीप्रामाण्यवादी होत. डेइस्टांची ख्रिश्चन धर्माची कठोर चिकित्सा केली आणि विशेषतः न्यूटनाच्या नवविज्ञानाच्या संदर्भात ख्रिश्चन धर्माची पुर्नमांडणी करण्याचा प्रयत्न केला. 'निर्मिक' ही ईश संकल्पना फुल्यांनी डेईस्टांकडून घेतली. (पृ. 53, वैचारीक जडण–घडण, सदानंद मोरे)

राजकीय सुधारणावाद व विज्ञान निष्ठेचा अंगीकार करून या धर्मचळवळींनी सुसंगत ऐकेश्वरी श्रद्धेचा नवा अविष्कार घडवला. ईश्वर निष्ठेची कसोटी म्हणून त्यांनी समाजिक–राजकीय जीवनातील परिवर्तनाला अग्रक्रम दिला आणि इहवादी विश्वदृष्टीच दृढमूल करण्याचा प्रयत्न केला. थॉमस पेनच्या डेइस्ट धर्म विचाराने कामगारांच्या भांडवलशाही विरुद्धच्या संघर्षाला वैचारीक व सांस्कृतिक बळ पुरवले. ब्रिटन मधील वर्ग संघर्षाची धार घेऊन डेइस्ट विचार भारतात दाखल झाला. वसाहतवादी संदर्भात उभ्या राहिलेल्या जाती संघर्षाला या धर्मविचाराने बळ पुरवले. महात्मा फुले यांचा डेइस्ट धर्मविचारांशी 1847 सालीच परिचय झाला. डेइस्ट विचारांची राजकीय–सामाजिक आक्रमकता महात्मा फुले यांच्या विचारांचे सूत्र बनले. त्यांनी बळीचे ऐतिहासिक मिथक राजकीय–सामाजिक आदर्श म्हणूनच घडवले. बळीच्या प्रतिकातून येणारा थॉमस पेनच्या डेइस्ट मूल्यविचारांचा धागा वॉशिंग्टन, ब्रूटस यांच्या लोकसत्तात्मक राज्य विचाराशी व ख्रिस्ताच्या मानवतावादी विचारांशी जोडला व मानवाचा वैश्विक धर्म म्हणून सत्यधर्माची घटना म. फुले यांनी केली. महात्मा फुल्यांनी 5 डिसेंबर 1872 च्या पत्राद्वारा त्यांनी डेइस्ट धर्माचा विचार अधोरेखित केला. त्यांनी थॉमस पेनचा उत्पन्नकर्ता (creator) हा शब्द ईश्वरासाठी योजला. डेइस्ट धर्माची ऐकेश्वरीनिष्ठा व्यक्त करून जाती उच्छेदाच्या कार्यक्रमाची घोषणा केली आणि जाती उच्छेदाच्या उद्दीष्टाशी डेइस्ट ईश्वर कल्पनेचे अनोन्यत्व प्रस्थापित करून सत्य धर्माची ईश्वर कल्पना उभी केली.

**महात्मा फुल्यांचा 'निर्मिक'**

महात्मा फुल्यांना आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीकडून तीन प्रेरणा मिळाल्या. एक म्हणजे मूलभूत मानवी हक्क, दुसरे त्यावर आधारलेला विश्वकुटुंबवाद आणि तिसरे म्हणजे विश्वाचे स्वरूप प्रकट करणारा बुद्धिवाद होय. जोतिरावांचा बुद्धी प्रमाण्यवाद वेदांचे श्रेष्ठत्व, चातुवर्ण्य, जातीव्यवस्था, स्वर्ग–नरक, आत्मा, अवतार झिडकारणारा होता. परंतु त्यांचा बुद्धीप्रामाण्यवाद कुठे संपतो आणि धर्म कुठे सुरू होतो याची लक्ष्मणरेषा स्पष्ट होत नाही. धर्माबद्दल आणि ईश्वरासंबंधी जोतिबांची कल्पना निरीश्वरवादी नव्हती त्यांना निर्मिकवाद मान्य होता. जोतिबांनी विश्वनिर्माण कर्ता कोणी आहे हे मान्य केले व त्याला निर्मिक असे म्हटले. जगातील ईश्वर वाचक जे शब्द प्रचलित आहेत त्या शब्दांच्या पाठीमागे आराधना, भक्ती, पूजा करण्याचे एक निरनिराळे कर्मकांड आहे. हे सर्व कर्मकांड व्यर्थ व मानवांमध्ये फूट पाडणारे आहे असे फुल्यांचे ठाम मत आहे. म्हणूनच त्यांनी ईश्वर, अल्ला, गॉड, ब्रम्ह इ. रूढ शब्द नाकारले व मानवाची सेवा किंवा मानवी समतेचे व स्वातंत्र्याचे रक्षण ही खरी ईश्वराची पूजा

होय असे ते म्हणतात.

परमेश्वर हा निर्मिक आहे ही त्यांची धारणा होती. अल्बर्ट आइन्स्टाइन सारख्या पदार्थ विज्ञान शास्त्रज्ञास देखील परमेश्वरा विषयीची निर्मिक भूमिका मान्य होती. त्याने सांगितले की, माझ्या प्रयोग शाळेत मी खूप प्रयोग केले अनेक शास्त्रीय सत्ये शोधून काढली, पण तरी देखील एक अंतिम सत्य मला सापडत नाही निसर्गावर नियंत्रण ठेवणारी जी एक अद्भूत शक्ती आहे तिला मी मानतो. जोतिबांची भूमिका तीच होती.

जोतिरावांच्या बुद्धी प्रमाण्यवादाच्या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी असे एक विधान केले आहे की, ''फुले हे ईश्वराची कल्पना सोडल्यास इतर सर्व बाबतीत पूर्ण बुद्धीवादी दिसतात.'' परंतु आपण जर फुल्यांची निर्मिक ही कल्पना सखोल अभ्यासली तर ती बुद्धी प्रामाण्यवादाशी सुसंगत असल्याचे दिसते. फुल्यांची ईश्वर कल्पना चिद्वादी–चैतन्यवादी प्रस्थापित ईश्वरापेक्षा भिन्न होती. सामाजिक जीवन आणि प्रचलित ईश्वर कल्पना यांच्यातील संबंध द्वंद्वात्मक असतात. त्यानुसार बदलत्या आर्थिक–सांस्कृतिक परिस्थिती बरहुकूम ईश्वर कल्पनाही बदलते म्हणजेच धर्माची व ईश्वर या कल्पनेचीही उत्क्रांती होत असते. फुल्यांना याची पूर्ण कल्पना होती की समाजाला नीतीमान व सत्यशील बनवण्यासाठी 'ईश्वर' नावाचा आधार लागतो. म्हणूनच महात्मा फुले ईश्वराला पूर्णतः नाकारण्या ऐवजी त्याच्या जागी निर्मिकाचे अस्वित्व मान्य करतात. ईश्वराविषयीचा सर्व गूढवाद आणि अलौकीकवाद नाकारून त्यास मानवी आकलनाचा विषय जोतिरावांनी केला.

कॉ. प्र ाकर वैद्यांच्या मते, ''फुल्यांचा ईश्वर जवळ जवळ निसर्गरूप आहे व्यक्तीरूप नाही,'' तर या. वा. वडसकर म्हणतात फुल्यांचा ईश्वर विषयक दृष्टीकोनाचे अधिष्ठान इहवादी, जडवस्तूवादी व मानवतानिष्ठ क्रांतिवादी आहे. तर शरद पाटील म्हणतात महात्मा फुल्यांची ईश्वर कल्पना न्यूटन प्रणित ईश्वर कल्पनेसारखी आहे. थॉमसपेन यांनी घडवलेली ईश्वर कल्पना न्यूटनच्या प्रभावातून विकास पावली होती. ईश्वराने निर्माण केलेल्या विश्वाच्या वैज्ञानिक आकलनामधूनच ईश्वराचा बोध होईल अशी थॉमस पेनची धारणा होती. अशाच धाटणीचे मत महात्मा फुले यांनी व्यक्त केल्यामुळे शरद पाटलांनी महात्मा फुले यांच्या ईश्वर कल्पनेला ''सेश्वर यांत्रिक भौतिकवाद'' म्हणून गौरविले आहे.

**अब्राह्मणी तत्त्वप्रणालीची उभारणी**

महात्मा फुले यांच्या धर्मचिंतनाला असलेले अब्राह्मणी परंपरेचे अधिष्ठान तुकाराम पिंजन यांच्या आठवणीतून स्पष्ट होते. महात्मा फुले यांच्या दुकानात जमणारा सहका-यांचा गोतावळा कबीराच्या बीजक ग्रंथातील 'बीप्रमती' हा भाग ज्ञानगिरी बुवांकडून मराठीतून समजून घेत असे व त्या आधारे चर्चा करत असे 'बीप्रमती'च्या आधाराने घडलेल्या या विचार मंथनाच्या पार्श्वभूमीवर सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्याचे तुकाराम पिंजन सांगतात.

महात्मा फुले यांच्या मते ब्राह्मणांनी ईश्वराचा हवाला देऊन शूद्रतिशूद्रांना ब्राह्मणांचे वर्चस्व स्विकारण्यास बाध्य केले. ब्राह्मणांनी धर्म कल्पनेच्या चौकटीत वर्ण–जाती व्यवस्थेचे थोतांड उभे करून ते शूद्रातिशूद्रांच्या मनात ठसवले. महात्मा फुले म्हणतात ईश्वर हे धर्म संकल्पनेचे कळीचे तत्त्व आहे, कोणत्याही आध्यात्मिक वा ऐहीक

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – V February 2014

तत्त्वाला दैवी आधार दिल्यावर ईश्वर श्रद्ध समुदायाला त्याचा स्विकार करावा लागतो. आणि म्हणूनच डेइस्ट ऐकेश्वरवादाची कसोटी आधारभूत ठेवून महात्मा फुले वैदिक ईश्वर विचाराची चिकित्सा करतात. त्यांच्या मते आर्यास निर्माणकर्त्या विषयी बिलकुल ज्ञान नव्हते. आपल्या मनाचा समर्थनार्थ फुलेंनी आर्यांच्या सूर्य व अग्नीपूजेचा तसेच यज्ञादी हिंसक कर्मकांडाचा तपशील दिला. गाया–बोकडाचे निघृणपणे प्राण घेणारा आर्यांचा ईश्वर निर्मिकाच्या प्रतिष्ठेशी जुळणारा नसल्याचे त्यांनी सुचवले. डेइस्ट ईश्वर कल्पनेच्या चौकटीत वेदांची मीमांसा करून महात्मा फुले यांनी ईश्वराप्रती असलेली मानवाची कर्तव्ये, मानवनीती व निर्मिकाचे भय वेदांमध्ये दृष्टीस पडत नसल्याचे स्पष्ट केले.

महात्मा फुले यांची ही ब्राह्मणी धर्माची चिकित्सा आधुनिक काळात अब्राह्मणी चिकित्सेचा पाया घालते. वेद विरोध, वर्ण–जाती व्यवस्था विरोध व ब्राह्मणी पितृसत्तेचा विरोध या तीन तत्त्वांच्या आधारे भारतीय संस्कृतीची मीमांसा घडवते. वेद प्रामाण्यवादी, वर्ण–जाती व्यवस्थावादी व पितृसत्ताकवादी ब्राह्मणी धर्माला नकार देते व बळीपासून छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंत चालत आलेल्या जाती संघर्षाच्या परंपरेमध्ये पर्यायी धर्मतत्त्वांची मांडणी करते. भारतात घडणाऱ्या जातीभेद विरोधी भक्ती चळवळींना, कळत–नकळत सुसंबद्ध विश्वभान देणाऱ्या जैन, बौद्ध तत्त्वज्ञानाच्याच प्रेरणा ला ल्या होत्या. जातीभेद विरोधी युक्तीवाद करणाऱ्या 'वज्रसूची' या बौद्ध संहीतेने महाराष्ट्रातील जाती व्यवस्था विरोधी धार्मिक विद्रोहाला वेळोवेळी तात्त्विक आधार पुरवला. त्यामुळेच म. फुले यांच्या धर्मचिंतनामध्ये जाती निषेधाची विचार प्रणाली जैविक रितीने सामावली गेली. जाती व्यवस्था विरोधाच्या बौद्ध प्रेरणा भक्ती चळवळीतून व दादोबा पांडुरंग यांच्याकडून महात्मा फुले यांच्याकडे आल्या. म. फुल्यांनी गौतमबुद्ध, बृहस्पती, तुकाराम महाराज यांच्या जाती व्यवस्थाविरोधी धर्मचिंतनाचा वारसा स्विकारून त्याला शूद्रातिशूद्रांच्या सत्वांचा भाग मानले. ब्राह्मणी धर्माशी झुंज घेणाऱ्या या जाति व्यवस्थाविरोधी अब्राह्मणी धर्मचिंतनाच्या परंपरेत त्यांनी पर्यायी सत्यधर्माचा शोध घेतला.

मानवी जीवनात अपरिहार्य व आवश्यक सामाजिक विधीची नवी इहवादी संहीता म. फुल्यांनी निर्माण केली त्यांनी पारंपारीक ब्राह्मणी ईश्वरोपासनेच्या कर्मकांडाला धुडकावले आणि जन्मविधी, नामसंस्कारविधी, विवाहविधी, श्राद्धविधी दशपिंडविधी, वास्तुशांतीविधी इ. विधींच्या पर्यायांची उभारणी अब्राह्मणी परंपरेच्या आधाराने केली. मूर्तीपूजा ही म. फुल्यांना भिक्षुकशाहीची आधारशीला वाटायची. जवळ–जवळ चाळीस वर्षे जोतिरावांनी धर्मचिकित्सा केली. 'धार्मिक' म्हणून प्रचलित असलेल्या चालीरीतींमागील आर्थिक–व्यवहारीक स्वार्थी संदर्भ त्यांनी स्पष्ट केले. निरर्थक कर्मकांड, फलज्योतिष, बुवाबाजी या सर्वांना त्यांनी विरोध केला व यत्नी धर्मप्रकरणी सत्यासत्य व कार्यकारणभाव यांचा शोध लावण्यास लोकांना सवय लावली.

म. फुल्यांनी अब्राह्मणी तत्त्वप्रणालीच्या सहाय्याने धर्मातील मिथकांची नत्याने मांडणी केली. प्रत्येक धर्मात मिथके असतात या मिथकांचा वापर सत्ता, संपत्ती, विशेषाधिकार यांची समाज चालत आलेली विषम वाटणी कशी अस्वित्वात आली व तीच योग्य कशी आहे याचे नैतिक समर्थन करण्यासाठी केला जातो. प्रतिसंस्कृती निर्माण करताना जुन्या मिथकांना उध्वस्त करावेच लागते. तमात्मा फुल्यांनी सुद्धा पुरूषसूक्तातील चार्तुवर्ण्याचे मिथक,

विष्णूच्या दशावताराचे मिथक यांची खिल्ली उडवली आहे. आणि शूद्रातिशूद्रांच्या खंडोबा, म्हसोबा, भैरोबा या देवतांच्या मिथकाची उकल करून त्यांचे ऐतिहासिकीकरण केले. बळीच्या ''लोकसत्ताक समजायुक्त राज्यातील सेवक'' असे ऐतिहासिक व्यक्तित्व व भूमिका त्यांनी या देवतांना बहाल केली. या देवतांना जाती संघर्षाचे नायक व नैतिक सद्वर्तनाचे ऐतिहासिक आदर्श म्हणून प्रस्थापित केले.

म. फुल्यांनी धर्म आणि मानवतावाद यांची सांगड घातल्यामुळे त्यांचा 'निर्मिक' उपवास, नैवेद्य याऐवजी मानवतावादी कार्याने प्रसन्न होणारा आहे. आज धर्माला आलेले विकृत स्वरूप, बुवाबाजीला आलेले उधाण पाहीले तर म. फुल्यांच्या धार्मिक विचारांचे महत्त्व कळते.

''धर्मराज्य भेद मानवा नसावे। सत्याने वागावे। ईशासाठी।।
खिस्त, महंमद मांग ब्राह्मणवासी। धरावे पोटासी। बंधूपरी।।
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक। भांडणे अनेक। कशासाठी।।''

**संदर्भग्रंथ**

1) कीर धनंजय, डॉ. मालेश स. ग., डॉ. फडके य. दी. (संपा.), महात्मा फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2006.
2) सुंथनकर, बी. आर., महाराष्ट्र 1858–1920, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई 1993.
3) बरके हरी (संपा.), शोधाच्या नव्या वाटा, महाराष्ट्र शासन प्रकाशन समिती, 1998.
4) डॉ. बगाडे उमेश, महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्तमानप्रभुत्व, सुगावा प्रकाशन, 2006.
5) तर्कतीर्थ जोशी, लक्ष्मणशास्त्री, जोतिचरित्र, नॅशनल बुक ट्रस्ट.
6) गर्गे स. मा. (संपा.), समाज सुधारक आणि अंधश्रद्धा, अंधश्रद्धा निर्मुलन समिती, पुणे, 1997.
7) डॉ. मुलाटे वासुदेव (संपा.), सार्वजनिक सत्यधर्म, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 1999.
8) नरके हरी (संपा.), आम्ही पाहीलेले फुले, महात्मा फुले चरित्रसाधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1993.
9) ऑमव्हेट, गेल, वसाहातिक समाजातील सांस्कृतिक बड, (भाषा) दिघे पी. डी., सुगावा प्रकाशन, पुणे, 1995.
10) सरदार गं. बा., महात्मा फुले, व्यक्तित्व आणि विचार, ग्रंथाली, 1981.
11) जोशी लक्ष्मण शास्त्री, पाश्चात्य संस्कृतीच्या संगमाने घडलेले भारतीयांचे धार्मिक व सामाजिक परिवर्तन, अभिरुची, ऑक्टो.–नोव्हें., 1948.
12) मोरे सदानंद, 'महात्मा फुले यांचा धर्मविचार, प्रेरणा आणि प्रभाव, समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टो. – डिसें. 1990.
13) दंडवते महद, परिवर्तनाचे पाईक : महात्मा फुले, न्या. रानडे, मुंबई विद्यापीठाच्या महात्मा फुले व्याख्यान मालेत झालेली दोन व्याख्याने, साधना प्रकाशन, पुणे 2001